सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१००.ठ. क्र......६५
दि...९।१।१९.....रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१००

पिपल लिव्हींग वुईथ एच आय व्ही अँन्ड एडस (PLHIV) ना मोफत बस प्रवास पास उपलब्ध करुन देणे कामी प्रस्तावात नमुद कारणास्तव विविध बसमार्गावरील शहरी व ग्रामीण भागातील एकूण ७६०२ लाभार्थी पासधारक यांना मोफत बसप्रवासाचे पासेस देणे त्याकरीता शहर हद्दीतील प्रति लाभार्थी प्रतिवर्षी रु.३६००/- व ग्रामीण भागाकरीता प्रति लाभार्थी प्रतिवर्षी सरासरी रु.७२००/- याप्रमाणे महाराष्ट्र स्टेट एडस् कंट्रोल सोसायटी, मुंबई यांना अनुदान मागणी करणेस तसेच लाभार्थीस उपक्रमाचे ओळखपत्र देणे व त्याकरीता रु.५/- इतकी आकारणी करणेस, सदर पासेसची स्वतंत्र रजिस्टरमध्ये नोंद घेऊन अं.ले.प. यांचेकडून तपासणी करणेस व सदरचा प्रस्ताव मा.परिवहन समिती यांचे शिफारशीने मा. सर्वसाधाराण सभे कडे मान्यतेस्तव सादर करणेकामी मा.परिवहन समिती ठराव क्र. तात-२/२७ दि.१५/०९/२०१७ चे शिफारसीने आलेले प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

तसेच सोमपाची व परिवहन समितीची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने पिपल लिव्हींग वुईथ एच आय व्ही अँन्ड एडस (PLHIV) यांच्याकडून मनपास निधी उपलब्ध झाल्यानंतर सदरच्या लाभार्थ्यांना लाभ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with
CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १०९ ठ. क्र.......६६ दि....९.१.१८.....रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका परिवहन समितीच्या सदस्यांना मानधन व सभा उपस्थिती भत्ता दिला जातो. प्रतिमाह मानधन रक्कम रु. २०००/- व प्रति सभा भत्ता रक्कम रु. १००/- दिला जातो. मा. शासनाने महानगरपालिका सदस्यांकरीता चालू वर्षापासून मानधन व सभा भत्तामध्ये वाढ करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार परिवहन सदस्यांची मानधन व भत्ता वाढ करण्याची मागणी होत आहे. प्राप्त परिस्थितीचा विचार करता मा. सदस्यांनी मानधन व भत्यामध्ये वाढ केलेली मागणी योग्य वाटते. तरी सोलापूर महानगरपालिका परिवहन सदस्यांकरीता प्रतिमाह रक्कम रु.४०००/- पर्यंत मानधन वाढ करणेस व पूर्वीप्रमाणेच प्रति सभा उपस्थिती भत्ता रक्कम रु. १००/- ठेवणेस, मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपूढे सादर करणेस्तव मा.परिवहन समिती ठराव क्र. ३६ दि.२८/०९/२०१७ चे शिफारसीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

मा.आयुक्त यांनी अभिप्राय दयावा.

नगर सचिव -

सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.902 ठ. क्र.....६0
दि....8/9/9८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१०२

सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम हे सोलापूर महानगरपालिका अंगीकृत शहर अंतर्गत प्रवासी वाहतुक सेवा देणारे उपक्रम आहे. परिवहन उपक्रम सन १९४९ पासून अविरतपणे कार्यरत आहे. सन १९९७ पासून या उपक्रमास अवैध वाहतुक, दुचाकी वाहने, डिझेलचे वाढलेले दर, स्वस्त बसभाडे, कनसेशन पासेस आणि ॲटो रिक्षांचे वाढते प्रमाण, अवैध रिक्षांचे शहर परिसरात झालेले अवैध वाहतुक इ. बाहय मुद्यांचा झालेला विपरीत परिणाम व खाते अंतर्गत प्रशासकीय कामांमधील त्रुटया, जसे पूर्णवेळ परिवहन व्यवस्थापक नसणे, इतर महत्वाच्या पदावरील जबाबदारी प्रभारी अधिकाऱ्यांकडून करुन घेणे, प्रशासन, वाहतुक व कर्मशाळा विभाग प्रमुखांचे नियोजन शुन्य कामकाज व नियंत्रण नसणे इ. मुळे परिवहन उपक्रमास घरघर लागून स्थिती खालावली आहे. मुख्यत्वे याबाबी परिवहन उपक्रमाची स्थिती खालाविण्यास जबाबदार आहेत.

मागील २० वर्षापासूनचा इतिहास पाहिल्यास अनेक वेळा हा उपक्रम चांगल्या अधिकाऱ्यांच्या व मा. पदाधिकाऱ्यांच्या कर्तृत्वामुळे पुन्हा पुन्हा उभारी घेतल्याचे दिसून येते. सोलापूर महानगरपालिकेने हा उपक्रम संपादित केल्याने, याची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिकेचीच आहे. महाराष्ट्र महागनरपालिका अधिनियम, महाराष्ट्र नागरी सेवा ॲक्ट, फॅक्टरी ॲक्ट व वेजेस ॲक्ट या महानगरपालिके प्रमाणे उपक्रमास देखील लागू आहेत. परिवहन विभाग चालविणे ही ही महागनरपालिकेची जबाबदारी आहे. इतर कोणाचीही नाही.

देशातील सार्वजनिक प्रवासी वाहतुक सेवा देणाऱ्या कोणतीही संस्था फायद्यात नाही, हे सरकरी आकडेवारीवरुन स्पष्ट होते. आमच्या मते हा उपक्रम एकतर नीट चालवावा अथवा पूर्ण बंद करावा. मग तो फायद्यात असो की तोटयात, कारण उपक्रमाची स्थापना ही नफा कमावण्यासाठी नसून ती गोरगरीब नागरीकांना स्वस्तात वाहतुक सेवा पुरविणे हा आहे. जर प्रशासकीय कामकाजामध्ये कांही त्रुटया असतील तर त्या प्रशासकीय स्तरावर ज्या त्या वेळेस दुरुस्त करणे अथवा कडक कारवाई करुन निपटारा करणे आवश्यक आहे. अनावश्यक मुद्दे उपस्थित करुन वेतनासारखे संवेदनशील विषय ताणले जाऊ नये असे वाटते.

सध्या परिवहन उपक्रमाकडील कामगारांचे सहा महिन्याचे वेतन थकीत आहेत. या वेतनासाठी कामगार संघटनांकडून वेतन देण्यासाठी तगादा लावण्यात येत आहे. संप, बंद पुकारण्यात येत आहे. वर परिच्छेद क्र. १ मध्ये नमुद बाबींचा सखोल विचार केल्यास, उपक्रमाच्या या स्थितीस केवळ कामगार जबाबदार नाहीत, किंबहुना ते नाहीतच. बाह्य मुद्यांसह प्रशासकीय व व्यवस्थापनातील मोठया प्रमाणातील त्रुटयाच असल्याचे आढळून येते.

सध्या परिवहन उपक्रमाकडून डिझेल पुरवठा व म.न.पा. कडील विविध विभागाच्या २५० वाहनांची दुरुस्ती व देखभाल बंद करण्यात आलेले आहे. यास मुख्यत्वे महानगरपालिका प्रशासन जबाबदार आहे. माहे. एप्रिल ते ऑगस्ट २०१७ अखेर विविध सदराखाली देय असलेली रक्कम म.न.पा. प्रशासनाकडून विनाकारण रोखण्यात आलेले आहे. यामुळे माहे एप्रिल २०१७ पासून दरमहा सुरु करण्यात आलेले वेतन थांबले गेले. डिझेल पुरवठा हातळणी शुल्काची रक्कम व म.न.पा. वाहनांच्या दुरुस्ती व देखभालसाठी कर्मशाळा मेनडेपो कडील तांत्रिक सेवकांच्या वेतनाच्या ६६% रक्कम अदा करण्याची योजना इ. मा. सर्वसाधारण सभेने धारेणाअंती ठराव पारीत करुन या योजनांची अंमल ठेवलेले आहे. म.न.पा. प्रशासनास यामध्ये बदल करावयाचे असल्यास तसा प्रस्ताव म.न.पा.कडे पाठवून मान्यतेअंती या योजना बंद करणे उचित ठरले असते. परंतु अचानक या योजनेपोटी मिळणारी रक्कम रोखण्यात आल्याने त्याचा परिणाम परिवहन उपक्रमाकडील कामगारांच्या वेतनावर झालेला आहे. अनेकदा मा. आयुक्त यांची भेट घेऊन या सर्व बाबी समजावण्याचा प्रयत्न परिवहन समितीकडून करण्यात आलेला आहे. परंतु याबाबत दखल घेण्यात आलेले नाही. यामुळे कामगार संघटना व मा. सभापती यांच्या संयुक्त निर्णयानुसार डिझेल पुरवठा व म.न.पा. कडील वाहन दुरुस्ती व देखभाल बंद करण्यात आलेले आहे.

..२

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

... व नियंत्रण नसणे इ. मळ

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 903 ठ. क्र. ९८
दि. ९/१/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला. १०३

परिवहन उपक्रमाकडील सेवकांना थकित ६ महिन्याचे वेतन अदा करणेकामी आर्थिक सहाय्य या तरतुदीमध्ये शिल्लक असलेली रक्कम रू. २,५७,७९,३३०/- यातून व उर्वथ्रत रक्कम रू. ३,०४,८४,२४८/- ही म.न.पा.कडून परिवहन उपक्रमास विशेष सहाय्य म्हणून अदा केल्यास सहा महिन्याचे थकित वेतन अदा करणे शक्य आहे. तरी परिवहन उपक्रमाकडील सेवकांना सहा महिन्याचे वेतन अदा करणेकामी परिवहन उपक्रमास आर्थिक सहाय्य या तरतुदीमध्ये शिल्लक असलेली रक्कम रू. २,५७,७९,३३०/- व म.न.पा.कडून परिवहन उपक्रमास विशेष निधी (सहाय्य) म्हणून अथवा पुढील होणाऱ्या तरतुदीमधून ॲडव्हान्स म्हणून रक्कम रू. ३,०४,८४,२४८/- अशी एकूण रक्कम रू. ५,६२,६३,५७८/- (अक्षरी रू. पाच कोटी बासष्ठ लाख त्रेसष्ठ हजार पाचशे अष्ठयाहत्तर फक्त) इतका निधी उपलब्ध होवून मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. परिवहन समितीपुढे शिफारशीसाठी व तद्नंतर मान्यतेस्तव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस्तव मा.परिवहन समिती ठराव क्र.तात-१/४० दि.२८/०९/२०१७ चे शिफारसीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी स्वत:कडे पदभार घेऊन योग्य ती कार्यवाही करणेसाठी मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१०४ ठ. क्र......६१ दि...६।१।१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सो.म.पा.परिवहन उपक्रमाकडील कर्मचा-यांचे थकित वेतन अदा करणेकामी मा.सर्वसाधारण सभेने उपक्रमाकडील कर्मचा-यांचे वेतनासाठी आर्थिक सहाय्य असे सदर निर्माण केल्यास त्यामध्ये केलेल्या तरतुदीमधून उपक्रमास वेतनासाठी आर्थिक सहाय्य म्हणून रक्कम देणे शक्य होणार आहे. याकरीता मा.सर्वसाधारण सभेने त्याप्रमाणे ठराव पारित करुन द्यावे असे ठरले आहे. त्याअनुषंगाने आजला मा.म.न.पा.चे अ-अंदाजपत्रकातील परिवहन उपक्रमास आर्थिक सहाय्य असे असलेले सदर बदलून उपक्रमाकडील कर्मचा-यांचे वेतन देणेकरीता सोयीस्कर होणेकामी सदरची परिवहन उपक्रमास आर्थिक सहाय्य हे सदर बदलून परिवहन उपक्रमासाठी आर्थिक सहाय्य व वेतनकरीता अशा आशयाच्या सदरामध्ये बदल करणेकामी ठराव पारित करणेस मा.परिवहन समितीच्या मान्यतेअंती शिफारशीने मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करणेस्तव मा.परिवहन समिती ठराव क्र.तात-२/४१ दि.२८/०९/२०१७ चे शिफारसीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी स्वत:कडे पदभार घेऊन योग्य ती कार्यवाही करणेसाठी मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१०५ ठ. क्र......८०
दि....६/१/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१०५

उपक्रमाकडील १० व्हॉल्वो ए.सी.बसेस भाडेवर देणेकरीता ई-निविदेव्दारे अथवा स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरप्रसिध्दीकरण करुन प्रती कि.मी. दर मागविणेस व त्याकरीता येणा-या खर्चास तसेच सदरचा तातडीचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.परिवहन समितीमार्फत मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस्तव मा.परिवहन समिती ठराव क्र.तात-३/४२ दि.२८/०९/२०१७ चे शिफारसीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केल.

मा.आयुक्त यांनी अभिप्राय दयावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१०६.ठ. क्र....६०९
दि...६/१/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१०६

मा.आयुक्त यांचे दि. १३-९-२०१७ चे २९ अ (१) नुसार महानगरपालिकेच्या मान्यतेसाठी टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (१) नुसार म.न.पा. ठरवेल त्यानुसार सोबत ( पाने १ ते ३ ) जोडलेल्या यादी व नकाशाप्रमाणे झोन रचना करणेस मान्यता देण्यात येत आहे.

जर सुचविलेले झोन कार्यालये गैरसोयीचे वाटत असेल तर नवीन केलेल्या यादीप्रमाणे त्या झोनमध्ये येणाऱ्या नगरसेवक व अधिकारी यांच्याशी चर्चा करुन त्या झोनचे कार्यालय सोयीप्रमाणे बदल करावयाचे असल्यास मा.आयुक्त यांना फक्त कार्यालय बदलण्याचे अधिकार देण्यात येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.९०७.ठ. क्र....८०२
दि....६।९।१९....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला. १०७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६९(१) व १५२ (ई) अन्वये आयुक्त या नात्याने असलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिकार नियंत्रण व पुनर्वलोकन करणेच्या अटीवर प्रस्तावातील तक्त्यात नमुद प्रमाणे सुधारित अधिकार प्रदान करण्याचे दि.२८/०९/२०१७चे मा.आयुक्त यांचे आदेश माहितीस्तव आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

प्रस्तुत बाबतीत यापूर्वी दि. २९-१०-२०१४ व दि. १०-१०-२०१६ ने अधिकार प्रदान करणेत आलेले आदेश काय होते याबाबत प्रकरणावरुन अवगत होत नाही. तरी संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.१०८.ठ. क्र.......९३
दि.....९/११/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१०८

नोटराईज दस्तावरुन मिळकतीची कर आकारणी करणेकामी भोगवटदार म्हणून नांव दाखल करणेबाबत प्रस्तावात नमुद प्रमाणे नोटराईज /अनोंदणीकृत दस्तानुसार भोगवटदार म्हणून फीचे दर ठरविणेस मा.महानगपालिका सक्षम आहे. त्यामुळे नोटराईज/अनोंदणीकृत दस्तानुसार आकारणी करावयाची झाल्यास दि.०५/१०/२०१७चे प्रस्तावातील अनुक्रमांक १ ते १० प्रमाणे व यातील अनुक्रमांक १ नुसार भोगवटदार नाव नोंदणी फी स्विकारणेस मा. महानगपालिकेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि.०५/१०/२०१७ चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देणेत येत असून अश्या प्रकरणाची भोगवटदार म्हणून स्वतंत्र रजिस्टर ठेवणेत यावे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ९०९ ..ठ. क्र. ....८४ दि....९/१/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१०९

मा. आयुक्त यांचे दि. ५-१०-२०१७ रोजीच्या टिपणीनुसार प्रस्तावात नमूद सर्व बाबी विचारात घेता सोलापूर महानगरपालिकेकडून अमृत योजने (Atal mission for Rejuvenation and Urban Transformation AMRUT) अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार योजना राबविणेस त्यासाठी योजनेअंतर्गत मंजूरी मा. केंद्र शासन, मा. राज्य शासन व महानगरपालिका हिश्यापोटी ५०:२५:२५ चे आकृतीबंधाप्रमाणे योजना राबविणेस, त्यानुसार मंजूर आकृतीबंधानुसार महानगरपालिकेकडून रक्कम रु. ४५.०६ कोटीचा हिस्सा उचलणेस तयार असलेबाबत व सन २०१७-१८ चे अंदापत्रकातील तरतुदीमधून आवश्यक तो खर्च करणेस, पुढील आर्थिक वर्षात आवश्यकतेनुसार बजेट तरतूद ठेवणेस व प्रस्तावातील सविस्तर पूर्वगणनपत्रकानुसार प्रत्यक्ष योजनेचे होणारे आर्थिक तरतुदीनुसार प्रकल्प पूर्ण करणेच्या दृष्टीने संपूर्ण कार्यवाही ठेवणेस मा. शासन निर्णयानुसार योजना अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूकीचे अनुषंगाने, भूसंपादनासाठी आवश्यक खाजगी मालकासोबत वाटाघाटी करणेस व म्हाडासोबत जागा हस्तांतरणाबाबत आवश्यक पत्रव्यवहार करणेस तसेच योजना राबविणेचे अनुषंगाने मा. शासन स्तरावर आवश्यक ते पत्रव्यवहार करणे संदर्भात मा. आयुक्त यांना अधिकार देणेस मा. सर्वसाधारण सभेची सक्षम मान्यतेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ५-१०-२०१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.११०..ठ. क्र.......७५
दि.....९/११/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

११०

सोलापूर महानगरपालिका प्र.क्र.१४ मधील तेलंगी पाच्छा पेठ येथील श्री.शकील जेलर यांचे घराशेजारील रस्त्यावर १५ वर्षे देशाची सेवा सैनिक या माध्यमातून करणारे मरहूम अ.गनी अ.कादर शेख,यांचे नाव देण्यांत यावे. त्यांनी १९६५ च्या भारत पाकीस्तान युध्दाचे वेळी त्या युध्दामध्ये भाग घेऊन भारत देशाकरिता बहुमोल अशी कामगीरी केली होती. त्यांच्या सेवेचा गौरव म्हणून त्यांची ओळख नविन पिढीला व्हावी याकरिता त्यांचे नाव वरील नमूद मार्गास देणेस, नामफलक लावणेस व याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाविधान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with
CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १११ ठ. क्र. ...७६
दि. ...६/१/१८... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१११

केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत सन २०१६-१७ हरित क्षेत्र विकास प्रकल्पा अंतर्गत १) रोहिणी नगर बाग,२) जानकी नगर बाग फेज-२,(३) गीता नगर बाग,४)सोरेगाव बाग व तसेच रस्त्याच्या लगत वृक्षारोपण १) D-mart ते चैतन्य नगर,२) आसरा पूल ते मजरेवाडी रेल्वे गेट या कामाबाबत मा.स्थायी समिती ठ.क्र.४१,दि.२६/०५/२०१७ अन्वये ENGARCH Architects & Designers. Kolhapur यांचेकडून र.रुपये १.५० कोटी इतक्या रक्कमेचे DPR तयार करुन घेणेस मान्यता देण्यांत येऊन,सदर ठरावामध्ये नमूद बाकी मुद्दे उपस्थित केलेले आहेत.सदर मुद्यांचा प्रस्तावात नमूद प्रमाणे सविस्तर खुलासा/अहवाल सादर केले असून,वरील कामाबाबत हॉरटीकल्चरचे काम र.रु.१,२०,२९,२२४/- इतकचे व सिव्हील वर्कचे काम र.रुपये ९,७०,३१२/- इतकेचे असे दहा कामासाठी जाहिर प्रसिध्दीकरण व त्या अनुषंगाने सदर कामासाठीची पुढील प्रक्रीया हाती असून, प्रस्तावात नमूद प्रमाणे सोलापूर शहरातील १) रोहिणी नगर,२)जानकी नगर फेज-२,(३) गीता नगर बाग, ४)सोरेगांव बाग सुधारणा करणे व ५) आसरा पूल ते मजरेवाडी रेल्वे गेट,६)D-Mart ते चैतन्य नगर रस्त्यालगत वृक्षारोपण करणे हि कामे केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत Green spece development अंतर्गत कामे असून,सदर कामासाठी शासनाने नियुक्त केलेल्या ENGARCH Architects & Designers. Kolhapur यांचे DPR तांत्रिक मान्यता मिळून त्या अनुषंगाने सदर पूर्वगणपनत्रकास प्रस्तावातील तक्त्यात नमूदप्रमाणे निधी उपलब्ध करणेकामी सदर तरतूदीस मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेस्तव मा.स्थायी समितीच्या शिफारशीने प्रस्ताव मंजूरीस्तव मा.म.न.पा.कडे सादर करणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक १३/९/१७चे टिपणीने आलेल्या प्रकरणास म.न.पा.ची मा.मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती ठ.क्र.१३६ दि.१०/१०/२०१७चे शिफारशीने आलेले प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

टिकेकरवाडी , विकास नगर , इंदिना नगर, विणकर नगर बाग, आंबेडकर उद्यान, रुपाभवानी उद्यान, कस्तुरबा उद्यान, जयभवानी प्रशाला उद्यान, माधवन नगर, स्टेट बँक कॉलनी, हुतात्मा बाग, विशाल नगर, कुमठे गाव, जगदंबा नगर, जोशी गल्ली, पापाराम नगर, सदिच्छा नगर, राजस्व नगर ते शहा नगर, नेहरु नगर रोडलगत, आदित्य नगर, मराठा वस्ती, अक्कलकोट रोड व एमआयडीसी विडी घरकुल व जुना प्रभाग क्र. १९ या ठिकाणीही करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

**सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष**
**सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज११२ ठ. क्र.......५५**
**दि....८/११/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव**
**बहुमताने/सर्वानुमते पास झाला.** ११२

शासन निर्णनुसार वैशिष्टयपुर्ण योजने अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेस मुलभूत सोयी सुविधाच्या विकासाकरिता र.रु.९.३५ कोटी अनुदान कामांच्या यादीनुसार मंजूर करणेत आलेले आहे.शासन निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार मुलभूत सोयी सुविधाच्या विकासाकरिता हिस्सा मधून करावयाची आहेत. त्यानुसार महानगरपालिकेने सदरचा विषय मा.सर्वसाधारण सभेपुढें ठेवून र.रु.९.३५ कोटी अंतर्गत म.न.पा.हिस्स्यातून घ्यावयाची कामे अंतिम केलेली आहेत. व मनपा हिस्सापोटी सोलापूर महानगरपालिकेस १४व्या वित्त आयोगा अंतर्गत निधी उपलब्ध करुन देणेत आलेनुसार, शासन अनुदान र.रु.८.८३ कोटी व मनपा हिस्सा र.रु.८.८३ कोटी असे एकूण र.रु.१७.६६ कोटी रकमेतून कामे होणेबाबत मा.सर्वसाधारण सभा ठ.क्र.२५० दि.१९/११/२०१५ ने मान्यता दिलेली आहे. मा.शासनाकडील दि.०४/१०/२०१७ च्या आदेशानुसार दि.३१ मार्च २०१६ पुर्वी मिळालेला निधी डिसेंबर २०१७ च्या आत खर्ची घालणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणे उपरोक्त योजने अंतर्गत म.न.पा.स प्राप्त अनुदान व मनपा हिस्सापोटी असे एकूण र.रु.१७.६६ कोटी मधून र.रु.२,१९,६०,९९६.०० इतका शिल्लक आहे.सदर शिल्लक रक्कमेतून उपरोक्त प्रस्तावात नमुद कारणास्तव व प्रस्तावातील तक्त्यात नमुद प्रमाणे कामे करणे आवश्यक असलेने सदची योजना राबविणेकामी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१०/१०/२०१७ चे टिपणीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

अमृत योजनेच्या रु. १८०.०० कोटी निधीमधून ड्रेनेज लाईनचे कामे हाती घेणेत आलेले आहेत. सदर यादीतील ड्रेनेज लाईनचे कामे वगळून ती अमृत योजनेतून करणेस मान्यता देणेत येत असून सदरची रक्कम ज्या भागात टँकरची संख्या जास्त आहे त्याभागात पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन घालण्यासाठी वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.११३.ठ. क्र.......५८ दि...१।१।१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

११३

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने पाच मराठी माध्यम व एक उर्दु माध्यम अश्या एकुण सहा माध्यमिक शाळा चालविल्या जातात. या सहा प्रशालेना मा.महाराष्ट्र शासनाचे १००% अनुदान मंजुर आहे. प्रथ्येक प्रशालेस शासनातर्फे शिक्षक व इतर सेवकांची मंजुरी देण्यात आलली आहे. असे असताना महानगरपालिकेच्या वरील शालेत मंजुर शेडयुलपेक्षा हि कमी शिक्षक कार्यरत आहेत. सेवा निवृत्त झालेल्या शिक्षकांच्या जागा भरण्यात आलेल्या नाही. अनेक प्रशालेमध्ये तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर शिक्षकांच्या नेमणुका करण्यात येत होत्या त्या हि नेमणुका सध्या करण्यात आलेल्या नाही. उर्दु माध्यमिक शालेत फक्त दोनच शिक्षक सध्या कार्यरत असुन पाच जागा रिक्त आहेत. त्यामुळे तयाचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर व ओयासक्रमावर होत आहे. प्रशालेतील शिक्षकांच्या व इतर सेवकांच्या जागा भरण्याबाबत अनेक वेळा लेखी पत्रे देऊन व विविध शाळांकडुन मागण्या करुन हि याबाबत शिक्षक नियुक्तीमध्ये अक्षम्य दिरंगाई होत आहे.शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रामध्ये अश्या प्रकारची दिरंगाई करुन विद्यार्थ्यांचे भविष्याशी खेळणा-या शिक्षण खात्यात काम करणारे संबंधीतावर एक महिन्यात कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. व प्रत्येक शाळेमध्ये कमी असलेले शिक्षक व इतर सेवकांच्या नियुक्त्या तातडीने करण्यास मान्यतेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदर शाळेस सध्या अस्तित्वात असलेले मंजूर पदे, कार्यरत शिक्षक, विद्यार्थी संख्या व आवश्यक असलेल्या विषयवार शिक्षकांची माहिती मा. आयुक्त यांनी प्रशासनाधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन सर्वसाधारण सभेकडे फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ११४ ठ. क्र. ६०९
दि. ६/११/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र.८ क मधील शहरातील मुख्य लेंडकी नाला गेलेला आहे. या नाल्यावर महानगरपलिकेचे गणेशपेठ शॉपिंग सेंटरची इमारत बांधली आहे. या इमारतीखाली नाल्यामध्ये मख्य ड्रेनेज लाईल आहे. ती वारंवार चोकअप होते तसेच या मुख्य ड्रेनेज लाईनवरील मंगळवार बाजार, धाकटा राजवाडा, व त्यामागील नाल्यातील मॅनहोल गेल्या चार तें पाच ते पाच महिन्यांपासून चोकअप होऊन घाण पाणी नाल्यालगतच्या ड्रेनेजलाईनमधून मॅनहोल गेल्या चार ते पाच महिन्यांपासून चोकअप होऊन घाण पाणी नाल्यालगतच्या ड्रेनेजलाईनमधून मॅनहोलमधून ओव्हर फलो होऊन रस्त्यावर येत आहे.त्यामुळे दुर्गंधी पसरुन अनोराग्य अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.याबाबत वारंवार सदरबाबत कार्यवाही करणेविषयी विनंती व फोन तसेच पत्राव्दारे कळवूनही प्रशासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही ही बाब अतिशय गंभीर अशी आहे. याबाबत प्रभागातील सर्व सदस्य व नागरीकांनी आयुक्त व झोन अधिकारी यांचेशी पत्रव्यवहार करुन सदर बाबीची माहिति देखील दिलेली आहे. परंतु याबाबत प्रशासन अत्यंत ढिम्म व निष्क्रीय असल्याचे दिसून येत आहे.सध्या सणासुदीचे दिवस आहेत. मुख्यम्हणजे साथीचे रोगाचा थैमान संपूर्ण राज्यभर पसरलेला असताना व प्रशासनाला देखील सर्व माहित असताना अशा या जीवनावश्यक सोयी सुविधाविषयी गाफिल राहणे हे अत्यंत अक्षम्य अशी गोष्ट आहे. याबाबत संबंधितांवर कारवाई होणे उचित ठरणार आहे.

तरी नाल्यातील मुख्य ड्रेनेज लाईन त्यावरील सर्व मेनहोल मुख्य ड्रेनेज विभागाकडील सुपर सकर मशिन, जेटींग मशिन, कोटा मशिन व डिसील्टींग रिक्षाने तातडीने साफ करणे आवश्यक आहे. तसेच नाल्यावरील सर्व मॅनहोलची उंची तातडीने वाढविणे आवश्यक आहे. सध्या सणासुदीचे दिवस असल्याने लोकांमध्ये मोठया प्रमाणात असंतोषाची भावना पसरत असून, या सर्व बाबींचा विचार करता तात्काळ सदरचे मेनहोल, नाले व लाईन साफ करणेविषयी संबंधितांना आदेश होणेस विनंती आहे. तसेच यामध्ये अक्षम्य दिरंगाई करणा-या संबंधित सर्व अधिकारी व सेवकांविरुध्द कारवाई करणेस मान्यतेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

सन २०१७-१८ अंदाजपत्रकामधील भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यातील अ.क्र.१५वर नाला ट्रेनिंग करणे व नाल्याची उंची वाढविणे र.रुपये ३.०० कोटीची तरतूद असून, त्यामधून सदरची तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे. या कामाचे एस्टिमेट करणेस व त्याचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सादूल पेट्रोल पंपासमोरील मुद्रा सनसिटी लगत असलेल्या नाल्याचे तातडीने काम हाती घेणेसही मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with
CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.११५ ठ. क्र. ८० दि. ६।१।१८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

११५

सोलापूर शहरामध्ये चि.ओंकार अशोक महिंद्रकर हा २१ वर्षाचा मुलगा सोलापूर हैद्राबाद रोड वर रिक्षाला कंटेनरने उडविले. अपघातानंतर ओंकारच्या डोक्याला मुक्का मार लागला त्यामुळे तो बेशुध्द पडला. त्याला सिव्हिल रुग्णालयात दाखल केले तपासणीत ओंकारच्या ब्रेनडेड असल्याचे निदर्शनास आले त्यानंतर आई रेणूका यांनी ओंकारच्या अवयवांचे दान करण्याचा निर्णय व्यक्त केले ओंकारचे १.हृदय २. डोळे ३. किडनी ४. यकृत हे अवयव दान केले एका माऊलीने रिक्षा चालवणारा पोटचा गोळा ब्रेनडेड म्हणून घोषित केल्यानंतर दु:ख पचवून मन खंबीर करुन मुलाचे अवयव दान करुन त्याना किर्ती रुपे जिवंत ठेवण्याचा निर्णय घेतला त्याच्या अवयवामुळे चार जणांना लाभ झालेले आहे. तरी त्यांच्या कुटुंबात आई व अविवाहीत बहिण असल्यामुळे त्यांचे कुटुंबाचे उदारनिर्वाहसाठी कोणते ही साधन नसल्याने त्यांच्या कुटुंबास जास्तीत-जास्त आपल्या मनपाच्या वतीने आर्थिक मदत देण व त्यांचे आईस सन्मान करण्यास मान्यतेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

ओंकार अशोक महिंद्रकर हा एकुलता एक मुलगा अक्सीडेंटमध्ये वारल्यानंतर १.हृदय २. डोळे ३. किडनी ४. यकृत हे अवयव दान केले एका माऊलीने रिक्षा चालवणारा पोटचा गोळा ब्रेनडेड म्हणून घोषित केल्यानंतर दु:ख पचवून मन खंबीर करुन मुलाचे अवयव दान करुन त्याना किर्ती रुपे जिवंत ठेवण्याचा निर्णय घेतला त्याच्या अवयवामुळे चार जणांना लाभ झालेले आहे. त्यामुळे ओंकार महिंद्रकर यांच्या आईचे मनपाचे वतीने सन्मान करुन त्यांना र.रु. १.०० लाख आर्थिक मदत देणेबाबत मान्यता देणेस मा.महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

P.P.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ९९६ ठ. क्र......६१
दि....५/१०/१८....रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

११६

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. मानवी रक्त कोणत्याही प्रयोगशाळेत किंवा कारखान्यात तयार करता येत नाही. सिमेवर लढणाऱ्या जवानांपासून अपघातातील जखमींपर्यंत अनेकांचे प्राण ऐच्छिक रक्तदात्यांनी केलेल्या रक्तदानामुळे वाचतात. रक्तदानाच्या या चळवळीत सोलापूर शहर / जिल्हा कायमच अग्रेसर राहिलेला आहे. सोलापुरात तब्बल २९ शतकवीर रक्तदाते असून ज्यामध्ये दोन जोडपीसुध्दा आहेत. रक्तदात्यांच्या बरोबरच सोलापुरात फेरॅसिस (रक्तातील घटक) दात्यांची संख्या देखील लक्षणीय आहे. दोन रक्तदात्यांनी आतापर्यंत तब्बल १५० वेळा फेरॅसिस दिलेले आहे.

१९७५ पासून ह्या रक्तदान चळवळीत सक्रिय असलेले श्री.अशोक नावरे यांनी आतापर्यंत १७० वेळा रक्तदान व ३२ वेळा फेरॅसिस दिलेले आहे. अशा प्रकारे व्दिशतकवीर रक्तदाते संपूर्ण भारतात ते एकमेव असल्याचे समजते. छत्रपती शिवाजी सर्वोपचार रुग्णालयातील (सिव्हील) रक्तपेढी, गोपाबाई दमाणी रक्तपेढी व डॉ.हेडगेवार रक्तपेढी या तिनही रक्तपेढीमध्ये आजवर त्यांनी जवळपास १ ते दीड लाख यूनिट रक्त संकलीत करुन दिलेले आहे. १९८५ साली महाराष्ट्र सरकारने त्यांना सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार देऊन शतकवीर रक्तदाता म्हणून सुवर्णपदक देऊन गौरविले आहे.

ऑक्टोबर महिना हा रक्तदानमास म्हणून साजरा केला जातो. तरी व्दिशतकवीर रक्तदाते श्री.अशोक नावरे यांच्यासह सोलापुरातील सर्व शतकवीर रक्तदात्यांचे पालिकेतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

प्रभाग क्र.१९ मधील जयोस्तुते फाऊंडेशन व राजघराणा प्रतिष्ठान ह्या संस्थानी गणेशोत्सवाच्या काळात विविध सार्वजनिक मंडळांशी संपर्क साधून जवळपास एक टन निर्माल्य गोळा केले व त्या निर्माल्यांचं पावित्र्य राखत त्याच्यापासून गांडूळ खत निर्मिती ते करत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जलप्रदुषणाला आळा बसण्यास मदत झालेली आहे.

आपल्या शहरात कार्यरत असणाऱ्या इको फ्रेंडली क्लब या संस्थेच्या सदस्याकडून स्मार्ट सिटी सोबतच आपल्या शहराची ओळख ग्रीन सिटी झाली पाहिजे असा प्रयत्न असतो. गणेशोत्सवाच्या काळात स्थानिक मूर्तीकारांना सोबत घेऊन संस्थेने मातीच्या पर्यावरणपूरक गणेशमुर्ती उपलब्ध करुन दिल्या. शिवाय या संस्थेने देखील मोठ्या प्रमाणात निर्माल्य गोळा केले. २ ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधुन शहरातील ज्या भागात टपऱ्यांसमोर अधिक कचरा पडलेला आढळतो . त्या टपरीधारकांचे प्रबोधन करुन कचरा संकलनाकरिता त्यांना संस्थेच्यावतीने बॉक्स दिले. दिवाळी सारख्या उत्सवात पण चिनी आकाशदिव्यांचा वापर टाळला जावा याकरिता स्थानिकांकडून संस्थेने कागदी व कापडी आकाशदिवे उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न सुरु केला आहे.

हरित वसुंधरा फाऊंडेशन नावाची एक संघटना ज्यामध्ये सर्व अभियंता/ इंजिनिअर्स सदस्य आहेत. हे सदस्य आठवड्यातील एक दिवस वृक्षारोपणासाठी राखुन ठेवतात.जे कोणी वृक्ष संवर्धनाची जबाबदारी घेण्यास तयार असतील, त्यांच्या परिसरात हे सदस्य स्वखर्चातून रोपे घेऊन जातात व स्वतः खड्डे खोदून रोपे लाऊन देतात. गेल्या वर्षभरात हरित वसुंधरा फाऊंडेशनच्या माध्यमातून १६२० रोपे लावण्यात आली आहेत.

सोलापूर शहरापासून जवळच असलेला हिप्परगा तलाव. जो इंग्रजांच्या काळात बांधण्यात आलेला आहे. त्याची साठवणूक क्षमता जवळपास साडेतीन टीएमसी आहे. या तलावातील संपूर्ण गाळ काढला गेल्यास सोलापूरसह आजूबाजूच्या खेडेगांवाची तहान भागविण्याची या तलावाची क्षमता आहे. वर्ष-दीडवर्षापासून भक्ती जाधव व त्यांचे तीन बंधू यांनी या कार्यासाठी स्वतःला झोकून दिलेले आहे. एकूण २६ लाख ट्रक गाळ काढण्याचा जलसंवर्धन अभियांनातील सदस्यांचा संकल्प आहे. हा गाळ काढल्यानंतर उजनीतील मैलामिश्रीत पाण्या ऐवजी सोलापूरकरांना पिण्यासाठी शुध्द पाणी मिळेल व हे पाणी नैसर्गिक उताराने शहरात आणणे शक्य असल्याने उजनीचे पाणी आणण्यासाठी वीज बिलापोटी होणारा वर्षाला अंदाजे पंधरा कोटी रुपये महानगरपलिकेचा खर्च वाचू शकतो.

आतिश कविता लक्ष्मण सिरसट हा सोलापुरातील तरुण मनोरुग्णांना चांगले जीवन जगता यावे यासाठी सतत धडपडत असतो. त्यांना निवारा देणं, चांगलं जेवण पोहचविणं, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणं आदी कामे हा तरुण अविरत करत असतो.

नानासाहेब धर्माकारी प्रतिष्ठानचे साधक शहरात जलपुनःभरणाविषयी, वृक्षारोपण व संवर्धन, स्वच्छता मोहिम आदी सामाजिक कामात खूप मोठ्या प्रमाणात योगदान देत असतात.

दैनिक सकाळ समुहाने वेळोवेळी शहरात स्वच्छता मोहिम राबवून आपलं योगदान दिलेलं आहे.

वरील सर्व व्यक्ती व संस्था वेगवेगळया क्षेत्रात कार्यरत असल्या, तरी खऱ्या अर्थाने त्या राष्ट्र ऊभारणीच्या कार्यात योगदान देत आहेत आणि म्हणूनच त्यांचा गौरव करणे , त्यांचे अभिनंदन करणे हा आपला राजधर्म आहे.

वरील सर्व व्यक्ती व संस्थांचा यथोचित सन्मान करण्यास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ११५ ठ. क्र. ८२
दि. १/१/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

११७

सोलापूर शहरातील प्र.क्र.२३ मध्ये अत्तार नगरकडे जाणा-या रस्त्यास राजेश शहाजी मार्ग पंचमुखी चौक असे नामकरण करण्या व नामफलक लावण्यास व येणा-या खर्चास मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाविधान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with
CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ११८... ठ. क्र. ......८३
दि. ...९/१/१८...... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री.श्रीनिवास दत्तात्रय दासरी, वय ४५ वर्षे राहणार- घर नं. १८५, धोत्रेकर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर हे मजूर असून , रोज मोल-मजूरी करुन स्वतःचा व स्वतःच्या कुटुंबियांचा ते उदरनिर्वाह करीत आहेत. यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखिची आहे. यांची पत्नी सौ. शोभा श्रीनिवास दासरी, वय ४१ वर्षे यांना ब्लड कॅन्सर झाला असून, ते नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल बार्शी, जि-सोलापूर येथे उपचार घेत आहेत. यांना केमिओथेरपी करणेस र.रुपये २,००,०००/- (अक्षरी-र.रुपये दोन लाख) खर्च अपेक्षित असलेचे सांगणेत आलेले आहे. परंतु, श्री. श्रीनिवास द.दासरी हे मोल-मजूरी करीत असलेने मुलांच्या शिक्षणाचा खर्च व पत्नीचे औषधोपचाराचा खर्च भागविणे त्यांना शक्य नाही.

तरी श्री.श्रीनिवास दत्तात्रय दासरी यांची पत्नी सौ.शोभा श्रीनिवास दासरी यांचे केमिओथेरपी उपचार करणेसाठी जास्तीतत जास्त आर्थिक मदत महानगरपालिकेचया वतीने देणेस मान्यतेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ११६ ... ठ. क्र. ... ८४ दि. ... ६।१।१८ ..... रोजी ठेवला खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

११९

सोलापूर महानगरपालिका प्र.क्र.१३ क मधील भगवान नगर झोपडपट्टी एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत लाभार्थीना लॉटरी पध्दतीने दि.७ जून २०१४ मध्ये लॉटरी काढून सदनिकांचे वाटप करण्यांत आले होते. त्या ठिकाणी आजपर्यंत त्या लाभार्थीना कब्जा दिलेला नाही. कारण सध्या तेथे जे विभक्त लाभार्थी त्यांना दिलेल्या लॉटरीतील अनुक्रमांनुसार सदनिकेमध्ये ते राहण्यास गेले आहेत. मात्र ते लाभार्थी विभक्त असल्याने त्यांना देण्यांत आलेली सदनिका खाली करुन महानगरपालिकेचे ताब्यात देणेकामी नोटीस बजाविण्यांत आलेली आहे. या अशा पध्दतीच्या २९ विभक्त लाभार्थीना त्यांचे सदनिकेचा लॉटरीतील निघालेल्या अनुक्रमांनुसारच त्यांना कब्जा देण्यांत यावा. त्यांना त्या सदनिकेचा कब्जा न दिल्यास ती विभक्त कुटुंबे त्यांचा निवारा जाऊन उघडयावर पडणार आहेत यास्तव त्यांना त्यांचे लॉटरीतील निघालेल्या अनुक्रमानुसार सदनिकेचा ताबा देण्यास मान्यतेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

एकाच कुटूंबात दोघांना घरे देणेत येऊ नये व शासनाच्या निकषाप्रमाणे सदनिकेचा ताबा देण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 920 ठ. क्र. 64
दि. 8/11/98 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१२०

सोलापूर शहरातील प्र.क्र.९ मध्ये कर्णिक नगर येथील चिल्ड्रन पार्कला महात्मा बसवेश्वर चिल्ड्रन पार्क असे नामकरण करण्यास व नामफलक नावण्यास व येणा-या खर्चास मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाविधान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner